# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेस नोट ४१३-२०२४** **दिनांक-०७/११/२०२४**

## "पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ कार्यक्षेत्रातील पोलीसांकडून ऑल आउट, कोंबिग ऑपरेशन."

---

विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक १५.१०.२०२४ पासुन आचार संहिता लागु करण्यात आली असुन त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत परिमंडळ-१ अधिनस्त काशिमीरा, काशिगांव, मिरारोड, नयानगर, नवघर, भाईंदर, उत्तन पोलीस ठाण्यात दिनांक ०६.११.२०२४ रोजी ऑल आउट, कोबिंग ऑपरेशन व नाकाबंदी राबवण्यात आली होती.

श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय व परिमंडळ-१ अधिनस्त विभागीय ३ सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस निरीक्षक – १२, सहा.पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक-३२ व पोलीस अंमलदार- १३० यांनी सदर कारवाईत सहभाग घेतला. ऑल आउट कोबिंग ऑपरेशन दरम्यान १० इसमावर बी.एन.एस.एस. प्रमाणे प्रतिबंधत्मक कारवाई करण्यात आली, ७ इसमानवर दारुबंदी कायदान्वये कारवाई करण्यात आली नमुद कारवाई मध्ये एकुण ११,५९,९४५/- रुपये किमंतीची दारु व मुद्देमाल जप्त करण्यात आला,१६ हिस्ट्रीशिटर तपासले, ३१ हॉटेल व लॉजेस तपासले, ०८ तडीपार इसमाना तपासले, एन.डी.पी.एस. कायदयान्वये अंमली पदार्थाचे सेवन केल्याबाबत ८ इसमावर केसेस करण्यात आल्या, कोप्ता अंतर्गत ७ एन.सी. दाखल केल्या, ७ पोलीस ठाणे हद्दीत नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते. नाकाबंदीच्या वेळी मोटार वाहन कायदया अन्वये ४७ केसेस करण्यात आल्या आहेत. तसेच आज दिनांक ७.११.२०२४ रोजी नयानगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये बॅक रोड परिसरामध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने नयानगर पोलीस ठाणे येथील अधिकारी अंमलदार संशयीत वाहनाची तपासणी करता असताना वाहन

क्र. एम.एच ०२ एफ. जी. ४६९८ या वाहनामध्ये १,०९,५०,०००/- रोख रक्कम मिळुन आली. सदर रक्कमेबाबत चौकशी सुरु आहे.











------ oooo ------